इंजि. वसंतराव गालफाडे सेवापूर्ती गौरव विशेषांक

स्वाभिमान

संपादक : विजयकुमार मोरे

विश्लेषा प्रकाशन, कान्हे, पुणे

संपादक

विजयकुमार रामचंद्र मोरे

इलाईट ग्रीन एकर्स, टाकवे रोड, जांभूळ,

ता. मावळ, जि. पुणे - ४१२१०६

मोबाइल : ७९७२८१६१८०

प्रकाशक

इंजि.वसंतराव बाबूराव गालफाडे मित्र मंडळ

छत्रपती संभाजीनगर,

जि. छत्रपती संभाजीनगर - महाराष्ट्र

मुद्रक

विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स

गट नं. ४४५, शनि मंदिराजवळ, कान्हे,

ता. मावळ, जि. पुणे - ४१२१०६

किंमत ५० रु.

इंजि. वसंतराव बाबूराव गालफाडे
मुख्य अभियंता,
जलसंधारण प्रादेशिक विभाग, नागपूर

एक नि:स्पृह अभियंता : वसंत गालफाडे

विजयकुमार मोरे (संपादक)

एकाद्या डोंगराच्या कड्यावर काळ्याभिन्न अशा पाषाणात अगदी केसाएवढ्या फटीतून एकादे पिंपळाचे हिरवेगार रोपटे डौलाने डोलताना आपण सर्वांनी पाहिले असेल. ते पाहिले की आपल्या मनात प्रश्न पडल्यावाचून रहात नाही की काय ही निसर्गाची किमया आहे! इतक्या अवघड जागी हे रोपटे कसे काय रुजले असेल? याला अन्न पाणी कुठून मिळत असेल? या रोपट्याचे पुढे भवितव्य काय असेल? असे अनेक प्रश्न आपल्याला हा चमत्कार बघितल्यानंतर पडतात. परंतु काही वर्षानंतर आपण बघितले तर तेच रोपटे आणखी मोठे झालेले दिसते. ज्या पाषाणात ते रोपटे वाढलेले असते त्या काळ्या भिन्न पाषाणाची किंचितशी फटही वाढलेली आपणास दिसून येते. याचा अर्थ असा की एक नाजूक रोपटे देखील कठिण पाषाणाला चिरुन आपले अस्तित्व निर्माण करते. त्याचप्रमाणे काही माणसे देखील अशीच या रोपट्याप्रमाणे असतात. आपल्या सद्गुणांनी, कठिण परिश्रमाने, ध्येयाने प्रेरित होऊन आणि संकटांवर मात करुन अत्यंत खडतर परिस्थितीतीतही आपले अस्तित्व सिध्द करतात. त्यापैकीच एक असलेले व्यक्तिमत्व म्हणजे इंजि. वसंत बाबूराव गालफाडे होत!

महाराष्ट्र शासनाच्या मृद आणि जल संधारण विभागाच्या मुख्य अभियंता या पदावरुन ते ३० एप्रिल २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे अस्तित्व देखील कठिण पाषाणात उगवलेल्या पिंपळाच्या रोपट्यासारखे प्रेरणादायी आहे. अत्यंत बिकट परिस्थिती असलेल्या एका सर्वसामान्य आणि शिक्षणाचा कुठल्याही प्रकारचा वारसा नसलेल्या कुटुंबात जन्म घेऊन शिक्षणाची जिद्द बाळगून इंजिनियरींगचे शिक्षण पूर्ण केले. शासकीय सेवेत रुजू झाले आणि कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता असा प्रवास थक्क करणारा आहे. अनेक तरुणांना प्रेरणा देणारा आहे.

इंजि. वसंत गालफाडे यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात असणाऱ्या पानगाव या खेड्यातला! या गावात स्वत:च्या मालकीची गुंठाभरही शेती नसलेल्या आणि उदरनिर्वाहासाठी केवळ दुसऱ्यांच्या शेतीतील मजूरीवर अवलंबून असलेल्या अतिशय गरिब कुटुंबातील बाबूराव आणि जिजाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यावेळी राज्यात नुकतीच दुष्काळाला सुरुवात झाली होती. लोकांना दररोज रोजंदारी केल्याशिवाय अन्नाची गाठ पडत नव्हती. घरात अठरा विश्व दारिद्र्य ! कुटुंबात सात भाऊ आणि एक बहिण तसेच एक आजी असा मोठा परिवार. या सर्वांची उपजिविका करता करता वडीलांच्या नाकी नऊ यायचे. परंतु आई वडील हे असे नाते असते की

कुटुंबात कितीही मुले असली तरी आधी मुलांच्या पोटापाण्याची सोय करणार आणि मग स्वत:च्या पोटाचे बघणार. वसंत गालफाडे यांची आजी गंगाई मात्र कुटुंबाचा वैचारिक आधार होती. ती शिकलेली नसली तरी चांगल्या वाईटाची पारख तिला होती. त्यावेळी देशभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीचे वारे गावागावात आणि गल्ली बोळात वाहत होते. त्यामुळे केवळ पुरुषच नव्हे तर बायका मुलेही त्याने प्रभावित झाली होती. वसंतरावांची आजी गंगाईदेखील बाबासाहेब यांच्या विचाराने प्रेरित झाली होती. आपली मुले शिकली नसली तरी निदान आपल्या नातवंडांनी तरी शिकून मोठे साहेब व्हावे. बाबासाहेबांसारखे साहेब बनावे असे तिला मनापासून वाटायचे. त्यामुळे तिनेच वसंतरावांचे बोट धरुन त्यांना शाळेचा रस्ता दाखवला. बाबासाहेब आंबेडकरांची शिक्षणाची चळवळ खेड्यापाड्यापर्यंत पोहचली होती. त्याचाच हा परिपाक होता. गोरगरिबांची मुले देखील शिकून मोठी होऊन साहेब होऊ शकतात हा आत्मविश्वास बाबासाहेबांनी लोकांच्या मनात निर्माण केला होता.

त्यावेळच्या गरिब कुटुंबाची धारणा अशी असायची की कष्ट करणारे हात वाढले की पैसा जास्त घरात येईल. त्यामुळे प्रत्येक घरात किमान सात आठ मुले जन्माला घातली जायची. त्यामुळे जवळपास सर्वच कुटुंबात सात आठ मुले असायची. परंतु आईवडीलांचे लक्ष केवळ त्यांनी लवकर मोठे व्हावे आणि कष्ट करुन कुटुंबाला हातभार लावावा एवढाच असायचा. आपल्या मुलांनी शाळेत जावे आणि शिकून मोठा साहेब व्हावे ही अपेक्षा त्या काळात केली जात नव्हती. परंतु आजी गंगाई अतिशय दूरदृष्टीच्या होत्या. आपल्या नातवांनी शाळेत जावे, शिकून मोठे साहेब व्हावे असे त्यांना नेहमीच वाटत असे. त्यासाठी त्यांनी आपल्या नातवांना शाळेची वाट दाखवली.

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि तो पिणारा गुरगुरल्याशिवाय रहाणार नाही हे बाबासाहेबांचे वाक्य अगदी प्रत्येकाच्या मनावर कोरले गेले होते. शाळेत जायला सुरुवात केल्यावर वसंतराव यांच्या वागण्यात, बोलण्यात आणि रहाणीमानात इतका बदल झाला की घरातील वडील, चुलते, आई आणि आजी या सर्वांचेच मत बनले की आता वाटेल ते झाले तरी वसंताचे शिक्षण पुर्ण करायचेच! घरातून पाठिंबा आणि पोषक वातावरण तयार झाल्यामुळे वसंतरावांनी मागे वळून पाहिलेच नाही. शिक्षणाच्या एकेक पायऱ्या ते धडाधड चढत गेले. शिक्षणाची गोडी आपोआप वाढत गेली. एकत्र कुटुंबातील चुलते, वडील सारे स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन वसंतरावांच्या शिक्षणाला हातभार लावत होते. खडकात रुजलेले रोपटे जसे बहरते तसे वसंतराव यांच्या शिक्षणाचा वेल त्यांना बहरत इंजिनियरींगकडे घेऊन गेला.

इयत्ता दहावीला चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर वसंतराव यांनी लातूरच्या पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन येथे प्रवेश घेतला. तिथे राहून शिक्षण घेणे म्हणजे दिव्यच होते. खर्चाचा डोंगर होता. परंतु गालफाडे कुटुंब एकत्र होते. त्या सर्वांनीच मनावर घेतले होते की वाटेल कष्ट उपसावे लागले तरी चालतील परंतु वसंताला इंजिनियर बनवायचेच. अवघे कुटुंब त्यांच्या ठामपणे पाठिशी उभे असल्याने त्यांना कुठल्याही अडचणीची झळ बसली नाही. मन लावून अभ्यास केला आणि एक दिवस ते इंजिनियर **वसंतराव गालफाडे** झाले.

सन १९८६ मध्ये त्यांनी लातूर येथील पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतनमधून सिव्हिल इंजिनियरींगचा

डिप्लोमा करुन ते बाहेर पडले. त्यावेळी गालफाडे कुटुंबाला जो अतिशय आनंद झाला तो पाहण्यासारखा होता. या आधी गालफाडे कुटुंबात कोणी क्लार्कदेखील झाले नव्हते. परंतु थेट एक इंजिनियर आपल्या कुटुंबात तयार झाला याचा आनंद सर्वांनाच झाला. सन १९८७ मध्ये इंजि. वसंत गालफाडे यांची पहिली पोस्टींग लातूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता या पदावर औसा या ठिकाणी झाली. त्यावेळी तेथे रोजगार हमीची कामे सुरु होती. त्या कामाचे स्वरुप समजावून घेण्याचे काम सुरु असतानाच अचानक शासनाचे धोरण बदलले. तात्कालिन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी झिरो बजेट आणले. याचा अर्थ कुठल्याही खात्यात नवीन नोकरभरती करायची नाही. एवढेच नव्हे तर गेल्या सहा महिन्यात जी नोकरभरती केली होती ती देखील रद्द करण्यात आली. याची झळ वसंतराव गालफाडे यांनाही बसली. सहा महिने पुर्ण व्हायच्या आधीच त्यांची नोकरी गेली. याचा खोलवर परिणाम गालफाडे कुटुंबावर झाला. पण म्हणतात ना पावसाने झोडपले आणि राजाने मारले तर तक्रार कोणाकडे करणार ! थेट मुख्यमंत्र्यानीच झिरो बजेटचा निर्णय घेतला असल्यामुळे तक्रार कुठे करणार? त्याविरोधात कोर्टात जाणे किंवा न्याय मागण्यासाठी कोणाकडे जाणार ? परंतु गोरगरिबांच्या वाट्याला अशा घटना वारंवार येत असतात. त्या पचवण्याची त्यांच्याकडे ताकद असते. त्याची सवयच झालेली असते. इंजि.वसंतराव गालफाडे आणि त्यांच्या कुटुंबाने हा धक्का मोठ्या धीराने पचविला. वसंत गालफाडे हे नोकरी गेली म्हणून हातावर ठेवून बसणारे व्यक्तिमत्व नव्हे. इतर ठिकाणीही त्यांचे प्रयत्न चालूच होते. कोशिश करनेवालों की कभी हार नहीं होती. त्यामुळे फार काळ त्यांना दुसऱ्या नोंकरीची वाट पहावी लागली नाही. केंद्र शासनाच्या भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या (बी.आर.ओ.) खात्यात कनिष्ठ अभियंता म्हणून १९८९ मध्ये ते रुजू झाले. या नवीन ठिकाणी कामाचे प्रशिक्षण घेणे गरजेचे होते. त्यानुसार त्यांनी ते सहा महिन्याचे प्रशिक्षण पुर्ण केले. प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यांची नेमणूक आसाम राज्यात एका खेड्यात झाली. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील नोकरी असल्यामुळे देशभरात कुठेही बदली होऊ शकत होती. त्यांनी आसाममध्ये जाण्याची देखील तयारी केली होती. परंतु त्यांचे नशिब बलवत्तर होते. त्यामुळे त्यांनी आधी दिलेल्या राज्य निवड मंडळाच्या परीक्षेचा निकाल नेमका याचवेळी लागला आणि त्यांना राज्याच्या पाटबंधारे खात्यात कनिष्ठ अभियंता म्हणून नियुक्ति मिळाली.

सन १९९० मध्ये त्यांची नियुक्ति पाटबंधारे खात्याच्या माजलगाव कालवा मंडळ अंतर्गत जायकवाडी टप्पा २ उपविभाग क्र ३ शिरसाळा येथे झाली. त्यावेळी या ठिकाणी मुख्य कालव्याची कामे सुरू होती. ती करण्याची जबाबदारी श्री वसंत गालफाडे यांनी अतिशय मेहनतीने आणि प्रामाणिकपणे पार पाडली. त्याचप्रमाणे तीन वितरिकेची कामे देखील यशस्वीरित्या पूर्ण केली. वेगवेगळ्या प्रकारची स्ट्रक्चरची कामे प्रलंबित होती. ती देखील दोन-तीन वर्षात त्यांनी पूर्ण केली. या दरम्यान ते आपल्या कुटुंबासह शिरसाळा येथील कॅम्पमध्येच राहत होते. बीड जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती आजच्या परिस्थितीपेक्षा वेगळी नव्हती. परंतु इंजि. वसंतराव गालफाडे यांची कामाची पद्धत आणि शिस्त यामुळे ते कोणाच्याही दबावाला बळी पडले नाहीत. कारण कामाच्या बाबतीत ते अगदी अचूक असत. कोणाला बोलायला जागा ठेवत नसत. त्यामुळे ते कोणाचे

अवास्तव बोलणे ऐकून घेत नसत. आपले काम प्रामाणिकपणे करणारे आणि लोकप्रतिधींची कामे न बोलता करणे यामुळे त्यांना फारसा त्रास झाला नाही. सन १९९० ते १९९३ अशी सलग तीन वर्षे त्यांनी बीड जिल्ह्यात चांगल्या पद्धतीने काम केले.

त्यानंतर १९९३ मध्ये इंजि. वसंत गालफाडे यांची बदली परभणी जिल्ह्यात जिंतूर येथे लघुपाटबंधारे स्थानिक स्तर येथे झाली. या ठिकाणी त्यांच्या हातून कोल्हापुरी पद्धतीचे अनेक बंधारे आणि एम. आय. टँकची कामे मोठ्या प्रमाणावर पार पडली. त्यांच्या कार्यकाळात अगदी समाधानकारक कोल्हापुरी बंधाऱ्याची कामे पूर्ण झाली. त्यामुळे लोक आजही त्यांचे नाव अभिमानाने घेतात. परभणी जिल्ह्यात तीन वर्षे काम केल्यानंतर त्यांची बदली पुन्हा १९९६ मध्ये नांदेड जिल्ह्यातील किनवट या नक्षलग्रस्त भागात झाली. त्यावेळी नक्षली कारवाया फार मोठ्या प्रमाणावर होत नसल्या तरी शासकीय अधिकारी मात्र त्या भागात बदली होऊन जायचे म्हटले की धसका घेत असत. परंतु इंजि. वसंत गालफाडे यांची विचारसरणी फुले शाहू आंबेडकरांची पुरोगामीत्वाची असल्याने त्यांना भीती वाटण्याऐवजी आदिवासी बांधवांसाठी काम करायला मिळते आहे याचा आनंद झाला. विशेष म्हणजे इंजि. वसंतराव गालफाडे यांनी अशा मागास नक्षली भागात आपल्या कुटुंबासह राहाण्याचा निर्णय अगदी निर्भय होऊन घेतला. त्या ठिकाणी त्यांना कधीही कुठल्याही प्रकारचा त्रास झाला नाही. मात्र दहशत कायम असायची. किनवटहून नांदेडला जाणारी शेवटची बस संध्याकाळी साडेपाच वाजता सुटायची. त्या गाडीसोबत एक शस्त्रधारी पोलीस देखील असायचा. इतकी दहशत होती. आजच्यासारखे मोबाईल देखील त्यावेळी नव्हते. संपर्क किंवा दळणवळणाची कोणतीही साधने त्यावेळी उपलब्ध नव्हती. त्यामुळे आदिवासी भागात अगदी आदिवासींप्रमाणे दिवस काढावे लागले. परंतु त्याचे जराही त्यांना वैषम्य त्याना वाटले नाही. आपल्या मुलाबाळांसोबत ते आनंदाने त्या ठिकाणी राहत होते.

त्यावेळी लघुपाटबंधारे विभागातर्फे तलावाची कामे मोठ्या प्रमाणावर चालत असत. तिथे स्थानिक आदिवासी बांधव मजूर म्हणून कामावर येत असत. परंतु त्यांनी कधीही इंजि. वसंतराव गालफाडे यांना त्रास दिला नाही. नक्षली भागात विशेषत: सरकारी अधिकाऱ्यांना त्रास होतो असे लोक सांगायचे. परंतु इंजि.वसंतराव गालफाडे यांच्या बाबतीत असे कधीही घडले नाही. कधीकधी कामाच्या ठिकाणी श्री गालफाडे साहेबांचा मुक्काम पडायचा. अशा वेळी सर्व आदिवासी मिळून साहेबांच्या जेवणाची व्यवस्था करायचे, त्यांना काय हवे काय नको ते पाहायचे. परंतु कधीही त्यांना त्रास दिला गेला नाही. त्यामुळे त्यांची तीन वर्षे सेवा तिथे आनंदात पार पडली. त्या कार्यकाळात त्यांनी सुरू केलेल्या कामांची तपासणी करण्याची संधी पुढे त्यांना प्रमोशन होऊन अधीक्षक अभियंता झाल्यावर मिळाली. तेथे बऱ्याच कालावधीनंतर म्हणजे १९९९ मध्ये गेल्यावर तेथील आदिवासी बांधवांनी त्यांची ओळख कायम ठेवून त्यांचे चांगले आदरातिथ्य केले. इथला समाज माणसाच्या चांगुलपणावर प्रेम करणारा आहे याचा अनुभव त्यांनी याची देही याची डोळा घेतला आहे. सन १९९९ मध्ये तत्कालीन अधीक्षक अभियंता श्री पी. एल. मोरे जल पूजनाच्या निमित्ताने या किनवट परिसरात आले असताना इंजि. गाङफाडे यांच्याकडून अत्यंत उत्तम दर्जाची कामे झालेली पाहून

त्यांना अत्यंत आनंद झाला. त्यावेळी ते म्हणाले, तुमच्यासारख्या अधिकाऱ्याची आमच्याकडे गरज आहे. औरंगाबादला चला. त्यानंतर खरोखरच अधीक्षक अभियंता श्री पी. एल. मोरे यांनी त्यांची बदली किनवटहून औरंगाबादला केली. वास्तविक पाहता या बदलीने श्री गालफाडे यांना आनंद व्हायला पाहिजे होता. परंतु त्यांना औरंगाबादला बदली झाल्याने फारसा आनंद झाला नाही. कारण किनवटला त्यांचे बरे चालले होते. घरभाडे कमी होते, इतर गरजाही कमी होत्या. त्यामुळे शहरासारखा महागाईचा फटका बसत नव्हता. त्यामुळे पैशाची बचत व्हायची. आता शहरात राहायचे म्हणजे सर्वच खर्च वाढणार! त्यामुळे त्यांना बदली झाल्याचा फारसा आनंद झाला नाही उलट त्यांना दुःखच वाटले.

सन १९९९ मध्ये ते किनवटहून औरंगाबादला बदली होऊन आले. त्यावेळी त्यांना पोस्टिंग मिळाली होती वैजापूर येथे नांदूर मधमेश्वर कालव्यावर! परंतु राहण्यासाठी मात्र त्यांनी औरंगाबाद शहरालाच प्राधान्य दिले. त्यांच्याच खात्यात असणाऱ्या एका त्यांच्या मित्राची बदली अन्यत्र झाली होती. त्यामुळे त्यांचे घर रिकामे झाले होते. त्या मित्राचेच घर लगेच त्यांना मिळाले.अन्यथा शहरात घर भाड्याने शोधायचे म्हणजे सुद्धा एक मोठा कार्यक्रम असतो. परंतु मित्राचे घर आहे तेच मिळाल्यामुळे तो प्रश्न मिटला. काही दिवस वैजापूर येथे काम केल्यानंतर पुन्हा सर्कलला बदली करुन घेतली आणि ते औरंगाबाद येथे बदलीवर आले. त्यावेळी त्यांना औरंगाबादला घेऊन येणारे अधीक्षक अभियंता पी. एल. मोरे यांनी अतिशय महत्त्वाचा आणि आयुष्याला कलाटणी देणारा सल्ला दिला. ते म्हणाले, तुम्ही तुमचे पुढील शिक्षण का चालू ठेवत नाही? पार्ट टाइम इंजिनियरींग कॉलेजला प्रवेश घेऊन डिग्री पूर्ण करा त्यानंतर तुम्ही एमपीएससीची परीक्षा देऊन क्लास वन अधिकारी होऊ शकता. तुमच्याकडे ते स्किल आहे. मोरे साहेबांचा सल्ला त्यांनी चांगलाच मनावर घेतला आणि लागलीच त्यांनी औरंगााबादच्या शासकीय इंजिनियरींग कॉलेजमध्ये पार्ट टाइम बीई साठी प्रवेश घेतला, त्याचे क्लासेस जॉईन केले.

दिवसभर कार्यालयात काम करायचे आणि संध्याकाळी क्लासेसला जायचे असा उपक्रम सुरू झाला. क्लासेस रात्री दहा वाजेपर्यंत सुरू असायचे. त्यानंतर घरी येऊन जेवण उरकून झोपेपर्यंत रात्रीचे बारा वाजायचे. परंतु त्यामध्ये आवड निर्माण झालेली असल्यामुळे ते कष्टही त्यांनी अगदी आनंदाने स्वीकारले. कधी कधी क्लासेससाठी लवकर जावे लागायचे. परंतु अधीक्षक अभियंता श्री मोरे आणि त्यांच्यानंतर आलेले श्री देवाजे या दोघांनी याकामी मोलाचे सहकार्य केले. त्यावेळी त्यांची मुलगी दहावीच्या परीक्षेची तयारी करीत होती. दोघां बापलेकींमध्ये स्पर्धा तयार करायचे. कोणाचे पर्सेंटेज जास्त मिळतात ते बघूया. परंतु त्यात मुलगी जिंकायची. जगात एकमेव बापलेकीचं असे नाते आहे की बाप हारल्यानंतरही त्याला आनंद होतो. कारण लेक जिंकलेला आनंद स्वत:च्या जिंकण्यापेक्षा अधिक असतो. वरिष्ठांचे सहकार्य आणि त्यांची मेहनत यामुळे त्यांनी बी.ई.ची पदवी २००४ मध्ये यशस्वीरित्या संपादन केली.

बी.ई.ची डिग्री तर मिळाली. परंतु तोपर्यंत वय वाढलेले होते. एमपीएससीची परीक्षा देण्याची वयोमर्यादा ३३ वर्षाची होती. ती तोपर्यंत संपली होती. परंतु म्हणतात ना इच्छाशक्ती जबरदस्त असेल

तर काहीही साध्य करता येते. कुठूनही मार्ग सापडतो. आता काय करावे असा प्रश्न त्यांच्यासमोर जेव्हा आ वासून उभा राहिला. तेव्हा अचानक एक राजकीय घडामोड झाली. केंद्रात मंत्री असलेले ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून राज्यात आले. मग त्यांनी पुढे एमपीएससीची वयोमर्यादा पाच वर्षांनी वाढवली. त्यामुळे ती ३८ वर्षे झाली आणि नेमके त्यावेळी इंजि. वसंत गालफाडे यांचे वय ३७ वर्ष ९ महिने आणि १२ दिवस होते. म्हणजेच अवघ्या अडीच महिन्यानंतर त्यांची ही वयोमर्यादा देखील ओलांडणार होती. त्यामुळे ही एकमेव संधी त्यांच्या आयुष्यात आली होती. ही संधी जर हुकली तर पुन्हा आयुष्यात क्लास वन अधिकारी होण्याचे स्वप्न बघता येणार नव्हते. त्यामुळे त्यांनी जीव प्राण मुठीत घेऊन एमपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली. डू ऑर डाय अशी परिस्थिती होती. त्यावेळी त्यांच्या अंतर्मनाचा आवाज त्यांनी ऐकला. आतला आवाज त्यांना टाहो फोडून सांगत होता की हे तू करू शकतोस! तुला यश नक्की मिळेल! श्री गालफाडे यांच्या डोळ्यासमोर केवळ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र तरळत होते. त्यातून त्यांना अंतरिक प्रेरणा मिळत होती. शेवटी त्यांनी आपल्या अंतर्मनाचा आवाज ऐकला आणि एमपीएससीची परीक्षा दिली. त्या आयुष्यातील पहिल्या आणि शेवटच्या एमपीएससी परीक्षेत त्यांना यश देखील मिळाले. त्यांचा आत्मविश्वास इतका दांडगा झाला की अतिशय कमी कालावधी असतानाही, अभ्यासासाठी कमी काळ मिळून देखील ते त्यामध्ये क्वालिफाय झाले. त्यावेळी त्यांचे कुटुंब आनंदात न्हाऊन निघाले होते. त्यांना आकाश ठेंगणे वाटायला लागले होते. एमपीएससीची परीक्षा पास झाल्यानंतर सहाय्यक अभियंता श्रेणी एक या पदासाठी त्यांचे सिलेक्शन झाले. या परीक्षेमुळे एक गोष्ट मात्र चांगली झाली की त्यांचा आत्मविश्वास प्रचंड दुणावला. आपण प्रयत्न केले की कुठेही यशस्वी होऊ शकतो याची खात्री त्यांना वाटायला लागली. एका प्रशासकीय अधिकाऱ्याकडे हा आत्मविश्वास असणे अत्यंत गरजेचे असते.

एमपीएससीतर्फे सहाय्यक अभियंता श्रेणी एक पदी सिलेक्शन झाल्यानंतर त्यांची नियुक्ती वैजापूर येथील नांदूर मधमेश्वर कालवा उपविभाग क्रमांक पाच येथे उपअभियंता म्हणून नियुक्ती झाली. या ठिकाणी त्यांना भरपूर काम करता आले. कालव्याची रखडलेली कामे मार्गी लावता आली. लाभक्षेत्र विकासाची कामे मार्गी लावता आली. त्याचप्रमाणे जवळपास ३० ते ४० लाभधारक शेतकऱ्यांच्या पाणी वापर संस्था स्थापन करून त्यांना पाण्याचा लाभ मिळवून देता आला. त्याचवेळी त्यांना आदर्श अभियंता हा पुरस्कार देखील मिळाला. याआधी देखील त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. सन १९९५ मध्ये त्यांना सुवर्णपदकही मिळाले आहे. अशा रीतीने २०११ पर्यंत त्यांनी नांदूर मधमेश्वर कालवा उपविभाग क्रमांक पाच येथे काम केले.

त्यानंतर त्यांची बदली लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग खुलताबाद येथे झाली. या ठिकाणी त्यांनी शासनाची जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर पुर्ण केली. पुढे सन २०१७ मध्ये इंजि.वसंतराव गालफाडे यांना प्रमोशन मिळाले आणि बीड येथे कार्यकारी अभियंता म्हणून पोस्टिंग मिळाली. सन २०१७ ते २०२१ पर्यंत त्यांनी बीड जिल्ह्यात जल शिवार अभियानाची

मोहीम अतिशय प्रभावीपणे राबवली. या जिल्ह्यात शून्य ते २५० हेक्टर क्षमतेचे अनेक प्रकल्प त्यांनी मार्गी लावले आणि पूर्ण देखील केले. बीड सारख्या जिल्ह्यात काम करताना अनेक प्रकल्प एकही तक्रार येऊ न देता पूर्ण केले हे विशेष! राजकीय मंडळींचा दबाव असायचा, परंतु श्री गालफाडे यांचा प्रामाणिकपणा आणि सचोटीने काम करण्याची पद्धत असल्यामुळे त्यांनी कुठे तक्रारीला वावच सोडला नाही. अर्थातच कुठेही तक्रार नाही की बदनामी नाही. अतिशय स्वच्छ प्रतिमेने त्यांनी बीड जिल्ह्यात काम केले आहे. जवळपास साडेतीन वर्षे त्यांनी बीड जिल्ह्यात यशस्वीपणे काम केले. कुठल्याही राजकीय पुढाऱ्याची साधी तक्रार सुद्धा येऊ दिली नाही. जलयुक्त शिवाराची कामे उत्कृष्ट दर्जाची झाल्याने लोकांनी तक्रारी तर केल्या नाहीतच उलट त्यांचे कौतुकच केले. बीड मधील साडेतीन वर्षात यशस्वी कार्य पाडल्यानंतर त्यांची पदोन्नतीवर बदली औरंगाबाद येथे झाली. औरंगाबाद येथील प्रादेशिक जल व मृदसंधारण कार्यालय येथे अधीक्षक अभियंता म्हणून सन २०२१ ते २०२४ पर्यंत त्यांनी काम केले. त्यावेळी त्यांच्या अखत्यारित मराठवाड्यातील आठही जिल्हे होते. या आठही जिल्ह्यातील जल शिवाराच्या कामांना त्यांनी गती दिली आणि पूर्णत्वास नेले. यशस्वी अधीक्षक अभियंता म्हणून त्यांची कारकीर्द राहिली आहे.

त्यानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये मुख्य अभियंता तथा अप्पर आयुक्त प्रादेशिक कार्यालय नागपूर येथे त्यांची बदली झाली. नागपूर आणि अमरावती क्षेत्रातील जलसंधारणाची कामे मार्गे लावली. जवळपास अडीचशे ते तीनशे कामे या ठिकाणी मार्गी लावली गेली. मालगुजारी तलावाची रखडलेली कामे देखील त्यांनीच मार्गी लावली. आदिवासी आर्थिक उन्नतीचे शासनाचे धोरण म्हणून सुरू केलेली कामे रखडली होती, ती त्यांनी मार्गी लावली. विदर्भातील अकरा जिल्ह्यातील सर्व योजनांची कामे गतीने आणि पारदर्शक पद्धतीने सुरु केली. अशा प्रकारे १९८७ साली सुरू झालेला शासकीय सेवेचा प्रवास अखेर ३० एप्रिल २०२५ रोजी ३५ वर्षे पूर्ण करून समाप्त होत आहे. या ३५ वर्षाच्या कालावधीत त्यांनी अनेक पुरस्कार मिळवले, अडवांस इन्क्रिमेंट मिळाली. कधी साधी तक्रार देखील त्यांच्या कारकिर्दीत झाली नाही. कुठल्याही प्रकारची तक्रार नाही की चौकशी नाही. इतर अधिकाऱ्यांसारखी त्यांच्या घरासमोर किंवा कार्यालयासमोर ठेकेदारांच्या रांगा लागू दिल्या नाहीत की कुणाच्या दबावाला ते बळी पडले नाहीत. चुकीचे काम करण्यासाठी कधी कुणी दबाव आणला नाही. एखादे आवश्यक असलेले काम राजकीय नेत्यांनी सांगितले तर ते नियमात बसवून पूर्ण केले. त्यामुळे कुठल्याही राजकीय नेत्यांची कधीही तक्रार आली नाही.इंजिनीयर वसंतराव गालफाडे यांची संपूर्ण कारकीर्द निष्कलंक पार पडली आहे. एकीकडे माहितीच्या अधिकाराचा गैरवापर, राजकारणी लोकांचा हस्तक्षेप आणि अंतर्गत अडचणी यापैकी कशाचाही परिणाम होऊ न देता त्यांनी आपली कारकीर्द यशस्वीपणे पार पाडली आहे. इंजि. वसंतराव गालफाडे यांच्या यशस्वी कारकिर्दीचे रहस्य त्यांच्या सकारात्मक दृष्टिकोनात आहे. प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक असतो. त्यांनी जेथे जेथे बदली होईल तिथे कुटुंबासह राहणे पसंत केले. कधीही मोक्याच्या ठिकाणी बदलीसाठी आग्रह धरला नाही किंवा वशिला लावला नाही. त्यामुळे त्यांची कारकीर्द सन्मानकारक आणि स्वाभिमानी ठरली आहे. त्यांचे व्यक्तिमत्व तरुण अभियंत्यांनी प्रेरणा घ्यावी असेच आहे. त्यामुळे तरुण अभियंतांचा एक दीपस्तंभ म्हणून शासन सेवेतून ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा आदर्श घेण्यासारखा आहे. त्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी लाख लाख शुभेच्छा!

मातृ पितृ देवो भव!

इंजि.वसंतराव गालफाडे व सौ.शोभा गालफाडे, वडील बाबूराव गालफाडे व दोन्ही माता जिजाई व लक्ष्मीबाईसह.

सुखी कुटुंब : श्री व सौ.गालफाडे कन्या डॉ.पल्लवी, इंजि. योगिता आणि इंजि.सायली सोबत...

गौरव आणि स्वाभिमान!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना इंजि. वसंतराव गालफाडे सोबत मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि जलसंधारण राज्यमंत्री मा.ना. इंद्रनील नाईक !

इंजि. विजय देवराज यांच्याकडून मुख्य अभियंता पदाचा कार्यभार स्वीकारताना इंजि.श्री गालफाडे

कस्तुरी सहवासात...

सौ. शोभा वसंतराव गालफाडे
सहचारिणी

मी सौभाग्यवती शोभा वसंतराव गालफाडे ! मी श्री वसंतराव गालफडे यांची धर्म पत्नी..! मी कला शाखेची पदवीधर आहे. विवाहाच्या वेळी माहेरची परिस्थिती तशी खूप बऱ्यापैकी होती... सांगायचे तात्पर्य असे की सर्व दैनंदिनी गरजांची पूर्तता सहज होऊन इतर बाबतीत सौख्य लाभलेली मी... माझा विवाह १९८८ मध्ये वसंतरावांसोबत झाला. ज्यावेळी गालफाडे परिवाराची सून म्हणून मी पानगावी घरी आले तेव्हा थोडे अवघडल्यासारखं वाटायला लागलं.. एकत्र कुटुंब आणि कुटुंबातील माणसांची संख्याही अधिक... दोन सासूबाई आणि सासरे यांच्या मजुरीपासून मिळणाऱ्या पैशातूनच रोजच्या दैनंदिनी गरजा भागायच्या... साहेबांचा नुकताच सिव्हिलचा डिप्लोमा पूर्ण झालेला होता. साहेब घरात सर्व भावंडात मोठे... त्यानंतर सहा लहान दीर... एक नणंद, दोन सासू आणि सासरे असा आमचा अकरा लोकांचं कुटुंब होतं. पुढील प्रवास कठीण वाटायला लागला. पण अशातच एक सुखावणारा क्षण म्हणजे साहेबांना राज्य शासनाच्या सेवेत कनिष्ठ अभियंता म्हणून नोकरी मिळाली. परंतु शासनाकडे बजेट उपलब्ध नसल्याने त्यांना रुजू होता आलं नाही. पुन्हा तब्बल तीन वर्षे प्रायव्हेट क्षेत्रात गंगाखेड व इतर ठिकाणी साहेब काम करायचे.

साहेब खूप जिद्दी आहेत. एखादी गोष्ट ठरवली की ती पूर्ण करायचीच ही त्यांची खुबी आहे. तशी जगण्याची समस्या खूप मोठी... पण माझ्या दोन्ही सासू आणि सासऱ्यांनी मला मुलीप्रमाणे या काळात सांभाळलं. साहेब मला नेहमीच म्हणायचे हे सगळं कुटुंब आता आपल्याला उभं करायचं आहे. कुटुंबाचा आधार व्हायचा आहे. पोरांचे शिक्षण पूर्ण करायचे आहे. सुरुवातीला

या सगळ्या गोष्टी अवघड आणि वेगळ्या वाटायला लागल्या. पण या कुटुंबात असणारे प्रेम, वात्सल्य, आदर आणि आपलेपणा यामुळे मी खूप रमले... सहा दीर एक नणंद ही माझी आपली भावंडे वाटायला लागली. आमच्यातला प्रेम लळा आणि जिव्हाळा दिवसेंदिवस वाढत गेला. काही कालावधी नंतर परत साहेब पुन्हा शासकीय सेवेत रुजू झाले. कुटुंबाला आधार झाला .. पगार तसा कमीच होता पण एक वेगळं समाधान होतं... पोरांच्या शिक्षण आणि घर खर्चात आई दादांना मदत झालेली... मग सुरु झालेला हा प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढायला लागला. सगळी पोरं शिकली, चांगल्या नोकऱ्या करू लागली, सर्वांची लग्नं झाली. सर्वांना मुलंबाळं झाली. आर्थिक सुबत्ता आली.

... पण मी आज खूप समाधानी आहे. साहेबांनी मला काही कमी पडू दिले नाही. मी जे जे मागितले ते ते मला मिळाले. माझ्या तिन्ही मुली उच्चशिक्षित आहेत. मोठी मुलगी पल्लवी डॉक्टर आहे. दुसरी इंजिनियर आहे आणि माझं शेंडेफळ आमचा जीव की प्राण असणारी सायली लंडनला मॅनेजर म्हणून उत्तम प्रकारे काम सांभाळते आहे. पानगावच्या झोपडपट्टीत राहणारं माझं कुटुंब आजची ओळख खूप मोठी आहे. गंगाई परिवाराचा नावलौकिक खूप मोठा आहे. एकेकाळी अकरा लोकांचं माझं कुटुंब जवळपास आता ४० जणांचं झालं आहे. एका छोट्या रोपट्याचं विशाल वटवृक्षात रूपांतर झालं आहे. आजही चाळीस माणसांचा परिवार एकत्र आहे. याचा सार्थ अभिमान आहे. ही सगळी किमया आमच्या माई गंगाईच्या कृपेने सार्थ करून दाखवली आहे आणि साहेबांच्या सोबतीने कुटुंबाच्या उभारणीत मला खारीचा वाटा उचलता आला याचा मला सार्थ अभिमान आहे !

आयुष्य सरळ साधं आणि आनंदी असतं. परंतु अपेक्षांचं आणि गरजांचं ओझं त्याला दु:खी बनवतं असं म्हणतात.

प्रेरणादायी अभियंता !

इंजि. ए.एम. खान

सेवानिवृत्त उपअभियंता
जल व मृद संधारण विभाग
औरंगाबाद

सन २००० पर्यंत माझी आणि श्री गालफाडे साहेबांची ओळख देखील नव्हती. मी नोव्हेंबर १९९४ पासून जलसंधारण मंडळ कार्यालय औरंगाबाद येथे कार्यरत होतो. सन २००० मध्ये मला कळाले की जालना विभागातील आमचे एक सहकारी अभियंता श्री गालफाडे साहेब यांची मंडल कार्यालयामध्ये बदली होत आहे. त्यांची मंडल कार्यालयामध्ये बदली होणार असल्यामुळे मी खूप आनंदी झालो होतो. कारण मला वाटत होते की जालना जिल्ह्याचा जो अतिरिक्त कारभार माझ्याकडे सोपवण्यात आला होता तो मला त्यांच्याकडे हस्तांतर करता येणार होता. त्यानंतर मला माझा नियमित कार्यभार सांभाळता येईल यामुळे मी त्यांच्या बदलीची वाट पहात होतो. परंतु श्री गालफाडे साहेबांना सर्कल ऑफिसमध्ये रुजू होण्यासाठी वेळ लागत होता. माझी त्यामुळे उत्सुकता वाढत होती. मी त्यांची अतिशय आतुरतेने वाट पाहत होतो. त्या आतुरते पोटीच मी त्यांना फोन केला आणि लवकरात लवकर रुजू होण्यासाठी वैयक्तिक पातळीवर विनंती केली.

श्री गालफाडे साहेब यथावकाश औरंगाबादच्या मंडल कार्यालयात रुजू झाले आणि जालना जिल्ह्याचा कारभार त्यांनी स्वीकारला. त्यानंतर काही काळातच आमची घट्ट मैत्री जमली. जणू आम्ही एकमेकांना अनेक वर्षापासून ओळखत आहोत अशा पद्धतीने आमचे नातेसंबंध तयार झाले. श्री गालफाडे साहेब आणि माझा औरंगाबादच्या सर्कल ऑफिसमध्ये सन २००० ते २००७ पर्यंत प्रत्यक्ष संपर्क राहिला. त्यानंतर जो आमचा ऋणानुबंध वाढत गेला तो आजतागायत कायम आहे.

श्री गालफाडे साहेब यांची सर्कल ऑफिसच्या कामकाजाची सुरुवात झाली. ते सर्कल ऑफिसमध्ये जरी नवीन रुजू झाले असले तरी त्यांनी अल्पकाळामध्येच या कार्यालयातील सर्व

कामकाजाचे कौशल्य आत्मसात केले. थोडक्यात सांगायचे तर श्री गालफाडे साहेब यांची अभियांत्रिकी पैलू समजून घेण्याची समज फारच उत्तम आहे. याशिवाय त्यांचे मराठी भाषेवर देखील अतिशय चांगले प्रभुत्व आहे. काही काळातच त्यांनी या कार्यालयात स्वतःची कुशल अभियंता अशी स्वतंत्र ओळख स्थापित केली. श्री गालफाडे साहेब अभियांत्रिकी डिप्लोमा धारक असल्याने ते त्या पात्रतेवर समाधानी नव्हते. त्यांची अपेक्षा वर्ग एकचे अधिकारी होण्याची होती. त्यांनी औरंगाबादच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यातून पार्ट टाइम पदवी कोर्स करण्याचा निर्णय घेतला. एकाच वेळी शासकीय कर्तव्ये पार पाडत असताना चार वर्षात बी ई हा पदवीचा कोर्स देखील पूर्ण केला. खरे तर ही बाब वाटते तितकी सोपी नव्हती. ते दैनंदिन शासकीय कामकाज पार पाडत असत आणि संध्याकाळी आणि सुट्टीच्या दिवशी अभ्यासासाठी अतिरिक्त वेळ काढत असत. त्यांना बी ई च्या अभ्यासासाठी इतर शासकीय डिपार्टमेंटच्या मित्रांचा चांगला सहवास लाभला. लोकांमध्ये एक म्हण रुढ आहे ना, स्वतःला मदत करणाऱ्यांना देव मदत करतो. श्री गालफाडे साहेब यांचे अविरत कष्ट पाहून जणू ईश्वराने त्याची दखलच घेतली होती. पार्ट टाइम बी ई संपताच त्यांनी एमपीएससी परीक्षेसाठी प्रवेश घेतला. परंतु त्यावेळी त्यांचे वय एमपीएससीला लागणाऱ्या वयापेक्षा जास्त होते. परंतु म्हणतात ना प्रयत्न करणाराला नशीब पण साथ देते. त्याप्रमाणे राज्य शासनाने एमपीएससीसाठी लागणाऱ्या वयोमानामध्ये वाढ केली आणि श्री गालफाडे साहेबांना केवळ एकच पहिली आणि शेवटची संधी प्राप्त झाली. त्यांच्या वयानुसार त्यांना ही शेवटची संधी होती. श्री गालफाडे साहेबांनी पुन्हा एमपीएससीसाठी कठोर परिश्रम घेतले.एमपीएससीसाठी मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले. पहिल्या प्रयत्नातच त्यांना यश आले. त्यानंतर उपअभियंता पदासाठी त्यांची निवड झाली ते क्षण अविस्मरणीय आहेत.

शाखा अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता ते मुख्य अभियंता असा आदर्श व कर्तव्य पूर्ण प्रवास प्रत्येकाला लाभत नाही. श्री गालफाडे साहेबांनी शासकीय स्तरावरील प्रत्येक पदाची गरिमा राखली आहे. गालफाडे साहेब यांचे शासकीय कामकाजातील आदर्श सर्वच नवीन आणि जुन्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना नेहमी प्रेरणा देत राहणारे आहेत. श्री गालफाडे साहेबांचा मी एक जवळचा मित्र म्हणून मला त्यांच्यातील गुणांचे अगदी जवळून दर्शन घडले आहे. त्याविषयी मी काही सांगू इच्छितो. गालफाडे साहेब एक व्यक्ती म्हणून अतिशय परिपूर्ण आणि चांगले व्यक्तिमत्व आहेत. एक अभियंता मित्र म्हणून त्यांचा मला अभिमान आहे. त्यांच्यामध्ये असणारा प्रामाणिकपणा, सचोटी, आदर, जबाबदारी, धैर्य, सहानुभूती, दयाळूपणा, करुणा, संयम, उदारता, चांगला संवाद, आत्मजागृती आत्म नियंत्रण, नम्रता, लवचिकता, मोकळेपणा, सकारात्मक दृष्टिकोन, आत्म प्रेरणा, शिक्षण आणि सतत पुढे जाण्याची धडपड या सर्व गुणांचा समुच्चय या एकाच व्यक्तीमध्ये मला आढळून आला. म्हणून मी या अभियंत्याला सलाम करतो. असे व्यक्तिमत्व सरकारी खात्यामध्ये फार क्वचित बघायला मिळते. त्यामुळे श्री गालफाडे साहेब आम्हा सर्वांसाठी एक प्रेरणास्थान आहेत. मित्र असावा तर असा! सर्व शासकीय कर्तव्ये पार पाडत अखेर नियत वयोमानानुसार माझे प्रिय मित्र गालफाडे साहेब सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवानिवृती नंतरचा प्रवास सुखाचा, समाधानाचा आणि आरोग्यदायी व्हावा ही ईश्वरचरणी प्रार्थना!

माझे पप्पा, माझे जग!

कु.सायली वसंत
तृतीय कन्या

माझ्या पप्पांबद्दल काही बोलायचं म्हणजे... खरं सांगायचं झालं तर शब्दच कमी पडतील. पण बोलायलाच हवं ! कारण त्यांच्या बद्दल जे काही मी सांगू शकते, तेच खरं तर माझं भाग्य आहे!

पप्पा...! त्यांनी आमचं आयुष्य स्वाभिमानाने जगण्याजोगं केलं आहे, Not just financially, but emotionally, mentally. त्यांनी आमच्या मनात असा काही आत्मविश्वास निर्माण करणारा विचार दिला की जगात काहीही अशक्य नाही. खरे तर नेपोलियन बोनापार्ट म्हणायचा की जगात अशक्य असं काहीही नाही. परंतु माझ्या पप्पानं तेच अशा पध्दतीने सांगितलं की मला ते त्यांचेच तत्वज्ञान वाटते आणि मी ते आत्मसातही केले.

त्या काळात ग्रामिण भागात कुटुंबाला वंशाचा दिवा म्हणून जेव्हा मुलगा हवाच ही मानसिकता जोरात होती. त्या परिस्थितीत त्यांनी तिसरी मुलगीच... म्हणजे मी !मला त्यांनी अगदी आनंदाने स्वीकारली! कधीच असं वाटू दिलं नाही की मी कोणत्या expectation चं अपयश आहे.

आईकडून आणि आजीकडून खूप ऐकलेलं... लोक काय काय बोलायचे, पण पप्पांनी कधीच त्यांना महत्त्व दिलं नाही. उलट अभिमानाने म्हणायचे – होय, माझ्या तीन मुलीच आहेत... आणि ते सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर जी विलक्षण चमक असायची ती वेगळीच जाणिव करुन द्यायची !माझं तर असं म्हणणं आहे की त्यांनी आम्हा मुलींना जन्म दिला नाही तर एका नव्या विचारांना जन्म दिला आहे.

त्यांनी संपूर्ण समाजाच्या संकल्पनांना challenge केलं.

पप्पांनी आम्हाला कधीही कोणत्याही मर्यादा नाहीत घातल्या. मनांसारखं काहीही करू दिलं. ॲक्टींग, सायन्स, हट्ट, वेडेपणा, सगळ्यांचं कौतुकच केलं. आज मी independent आहे, स्वतः च्या decisions confidently घेते ते फक्त आणि फक्त पप्पांमुळे.

मी त्यांचा सुरुवातीचा संघर्षाचा काळ पाहिलेला नाही, पण आईकडून, आजीकडून खूप काही ऐकलंय. मी त्यांची आणि आईची जुनी पत्रं पण वाचलीत...ज्यातून त्यांचा संघर्ष दिसतो. कधी स्टेशनवर झोपणं, कधी उपाशी राहून दुसऱ्या दिवशीची ट्रेन पकडणं. खूप संघर्ष आहे. परंतु त्याची झळ त्यांनी आमच्यापर्यंत कधी पोहचूच दिली नाही. तथापि त्यांनी आम्हाला कधीच हा त्यांचा त्रास दाखवला नाही. पण त्यांची मेहनत प्रत्येक गोष्टीत दिसते.

मला आठवतं, मी ५-६ वर्षांची होते. तेव्हा पप्पांनी इंजिनियरिंगच्या पदवीचं त्यांचं शिक्षण

सुरू केलं होतं. दिवसा नोकरी, संध्याकाळी लेक्चर, रात्री assignments – आणि मध्ये मी अत्यंत खोडकर आणि डिस्टर्ब करणारी! मी त्यांना डिस्टर्ब करायचे तेव्हा ते हसायचे – ही पण एक त्यांची परीक्षाच होती.

ते खूप शांत होते, पण त्यांचं dedication जबरदस्त होतं.

त्यांनी एमपीएससीची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात क्लिअर केली. तेही स्वत:चा जॉब आणि इतर सर्व जबाबदाऱ्या पेलून. तेव्हा मी फार छोटी होते, पण आज जेव्हा आठवतं ना, वाटतं – That's what real hustle looks like.

पप्पा नेहमी मला सल्ला देतात subtle, practical And Real. UK ला जायचं ठरवलं, तेव्हा माझ्यापेक्षा जास्त nervous पप्पा होते.

ते बोलत नव्हते फार, पण त्यांच्या डोळ्यांत सगळं दिसायचं.

They wanted me to fly, but letting go is hard... still, त्यांनी मला आशीर्वाद दिला – with full belief.

माझ्या १८व्या वाढदिवसाला मी त्यांना विचारलं की कलेक्टर ऑफिसला चल ना माझ्यासोबत. काही कागदपत्रे घेण्यासाठी. त्यांनी एकच वाक्य बोललं, कधीपर्यंत अशी कुबड्या घेऊन फिरणार? त्या दिवशी मी ठरवलं – आता सगळं independently करायचं. ताबडतोब आधी पासपोर्ट काढला. त्यानंतर कळलं की त्यांचे रागावणेदेखील माझ्या हितासाठीच होतं. त्यानंतर मात्र माझी कोणत्याही प्रकारची कामं मी स्वत:च करायला शिकले. आजही मी माझं नाव लिहिताना सायली वसंत असंच लिहिते. आडनाव नाही वापरत. कारण मला हवंय की त्यांच्या नावाचा गौरव माझ्या नावात कायम राहावा.

When someone says, Sayli Vasant, Product Manager Or Electronics Engineer. it feels complete.

पप्पांनी आम्हाला कधीच ओझं वाटू दिलं नाही.

ते हसून म्हणतात – सायली खूप expensive आहे! पण लगेचच बोलणार – पण ती खूप समजूतदारही आहे.

त्यांना माहित आहे – मी त्यांच्या नावाला कमीपणा येऊ देणार नाही.

आज आम्ही हॉटेलमध्ये जातो, ब्रँडेड कपडे वापरतो, पण आम्ही कधीही त्याचा गर्व करत नाही. कारण आम्हाला माहिती आहे – पप्पांनी किती संघर्ष करून हे सगळं मिळवलंय.

We just join him in his success. because his success is ours, and ours happiness is his. पप्पा तुमच्यासारखा बाप असणं ही माझ्या आयुष्यातली सगळ्यात मोठी achievement आहे.

तुमच्या नावात माझी ओळख आहे, आणि माझ्या प्रत्येक यशात तुमचं नाव कायम असणार आहे.

Sayali Vasant

मित्ररुपी मिळालेली सावली

समाजभूषण अभि/ॲड/कवी मैलारीराज धोंडीबा कावळे,
से.नि.उपविभागीय जलसंधारण अधिकारी,लातूर
जिल्हाध्यक्ष नक्षत्राचे देणं काव्यमंच.
पत्ता : कावळे नगर , बार्शी रोड , लातूर

सन १९९० हे वर्ष आमच्यासाठी आनंदाची पर्वणी ठरली. कारण सर्व आमचे सवंगडी यांची गुणवत्तेच्या आधारावर शासकीय सेवेमध्ये निवड झाली. ही १९९० ची विशेष बॅच म्हणजे वेगवेगळ्या पुष्पांनी सजवलेली एक पुष्प माळ असून त्यातील एक चतुरस्त्र पुष्प म्हणजे अभियंता वसंतराव गालफाडे होय . आम्ही एप्रिल १९९० मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर विविध ठिकाणी रुजू झालो. त्यामध्ये शिरसाळा येथे अभियंता वसंतराव गालफाडे , अभियंता विलासराव कांबळे , अभियंता गौतम कुरे , अभियंता प्रकाश येणकुरे आणि मी स्वतः अभियंता मैलारीराज कावळे. शिरसाळा मुख्यालयास हजर झाल्या पैकी एकमेव विवाहित जोडपे म्हणजे अभियंता गालफाडे साहेब होते. प्रत्येक सण असल्यास आम्हा सर्व सवंगडी यांना आवर्जून जेवणासाठी निमंत्रित करत असत. यावरूनच त्यांचा मित्रांसाठी प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी लक्षात येते. आपण निसर्गात जन्म घेतो आणि निसर्गातच विलीन होतो.

संपूर्ण आयुष्यात निसर्गाचे व आपले अतूट नाते असते. जन्म मृत्यूच्या मधल्या प्रवाहामध्ये शालेय जीवनापासून अनेक मित्रमंडळी, सगेसोयरे, सहकारी यांचा स्नेह संबंध येतो. आपला व्यवसाय हीच जीवनाची सावली असते. त्या सावलीत आपण आपले जीवन व्यतीत करतो. अशीच आम्हा १९९० च्या सर्व मित्रांना लाभलेली सावली म्हणजे अभियंता वसंतरावजी गालफाडे साहेब होय. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन आलेली मुले कधी इतिहास घडवत नसतात. प्रतिकूल परिस्थितीमध्ये जी मुले काळाच्या ओघात निधड्या छातीच्या संयमाने उभी राहतात तीच मुले खऱ्या अर्थाने इतिहास.

घडवत असतात. ती स्वकर्तृत्वाने तयार झालेली मुले असतात. त्यातील एक मूर्तीमंत उदाहरण म्हणजे अभियंता वसंतराव गालफाडे साहेब. सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो, याप्रमाणे निसर्गातही संगतीचा परिणाम होतो. फुलांच्या सहवासात मातीलाही गंध प्राप्त होतो. परिसाचा स्पर्श होताच लोखंडाचं सोनं होतं आणि सुतालाही फुलामुळे मान्यता प्राप्त होते. तसे आपल्या दिलदार व्यक्तिमत्त्वामुळे अनेक अभियंता मित्रांना सन्मान प्राप्त झाला आहे. म्हणूनच आमची १९९० ची बॅच एक कुटुंबच बनलेले आहे. प्रामाणिकपणाची झालर स्वभावाला नक्षीदार करे उत्तम चरित्र व संस्कार प्रामाणिकपणाची शिदोरी भरे . प्रतिकूल परिस्थितीवर मात करून अभियंता क्षेत्रात अतुलनीय सन्मान प्राप्त केलात हे आपल्या मेहनतीचे फळ आहे.

मला आठवते आम्ही शिरसाळा येथे सन १९९० मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू झालो. बराच काळ आमच्या समवेत कनिष्ठ अभियंता पदी असूनही पुढे अभियंता गालफाडे साहेबांनी मंडळ कार्यालयात असताना स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली. अफाट कष्ट आणि मेहनत पाहता खरोखरच आपल्या कार्याला तोड नाही हे विशेष सांगावेसे वाटते . कारण स्थापत्य अभियांत्रिकी पदवी मी स्वतः अभियंता , गौतम कूरे , अभियंता एस. एस. वाघमारे आदींनी केली परंतु पुढील वाटचाल म्हणजे एमपीएससी होणे शक्य झाले नाही. परंतु अभियंता गालफाडे साहेब यांनी आकाशाला गवसणी घालून कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता हा प्रवास पार केला. अशा या हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाला माझा सलाम आणि शतशः धन्यवाद. श्री गालफाडे साहेब यांना जवळून पाहताना अतिशय निर्मळ, निर्भय , तितकाच मृदू स्वभावाचा अभियंता म्हणून मी पाहिले आहे. परंतु शासकीय सेवा करत असताना त्यांच्या वाटेत काटे काही कमी नसतील. परंतु आलेल्या परिस्थितीवर मात करत नेनीवेला नाकारून जाणीवेचे झाड लावणारा माणूस म्हणून मला ते अधिक प्रिय वाटतात. विनय आणि विचार, निती आणि निर्भयता एकत्र आले तर त्या पदाला व माणसाला प्रतिष्ठा प्राप्त होते.

अभियंता व निर्मितीचा अनुयन संबंध आहे. अभियंता वसंतराव गालफाडे साहेबांनी विविध कार्यातून आपल्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देताना यशाने कधी हुरळून गेले नाहीत व अपयशाने कधी निराश झाले नाहीत . प्रत्येक क्षणी अनुभवाची शिदोरी त्यांनी जमवली आहे. तत्त्वासाठी व ध्येयपूर्तीसाठी श्रद्धा आणि मूल्य यांच्या संरक्षणासाठी शाहू, फुले आंबेडकरांची तत्त्वे त्यांनी जाणीवपूर्वक जोपासली आहेत. एक चांगला मित्र , उत्कृष्ट अभियंता, आदर्श कुटुंबप्रमुख या भूमिकेतून वावरताना अनुभवाला येणारी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील त्याग, निष्ठा , अभ्यासूवृत्ती, मानवता , मांगल्य हे गुण वंदनीय आहेत. महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण खात्यातील अभियंता वसंतराव गालफाडे यांचे कार्य अभिनंदनीय आहे. खात्याअंतर्गत काम करत असताना अधिकारी म्हणून त्यांनी गरजवंतांना खऱ्या अर्थाने न्याय दिला. निग्रही आणि अपरिग्रही वृत्तीने त्यांनी या खात्यात चोख सेवा बजावली, गर्विष्ठ आणि पदाचा गैरवापर करणारे अभियंता असंख्य असतील, परंतु नि:स्पृह व अनास्तव जीवन वर्तमानाला प्रेरणा देणारी कर्तव्यतत्परता , निर्भिड , निर्मळ , विवेकी प्रांजळ व्यक्तिमत्व ही त्या खात्याला मिळालेली देणगीच होय . कारण प्रामाणिक , प्रज्ञावंत व प्रतिभा संपन्न माणसं जन्मावीच लागतात ती तयार करता येत नाहीत . कष्टातून शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी एक उत्कृष्ट अभियंता म्हणून

ख्याती प्राप्त केली आहे. सौजन्यशील व स्वाभिमानी स्वभावामुळे त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रावर प्रभाव उमटविला. शासनाच्या नियमाप्रमाणे जे शक्य आहे ते आपले हयातीत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला . आपल्या कार्यातून अनेक मित्र जोडले. कार्य कुशलता , सहकार्याच्या प्रति सहानभूती , निष्ठा आणि सेवावृत्ती यातून मिळेल तसे कुटुंबीयांवर संस्कार केले आणि कुटुंबास शिस्त लावली हे उल्लेखनीय होय.

त्यांचे वडील बाबुराव गालफाडे व आई सौ जिजाबाई आणि लक्ष्मीबाई यांचे संस्कार, त्यांची शिस्त आणि प्रेरणा यांची जाणीव ठेवून परिवाराला वाहून घेणाऱ्या अभियंता वसंतराव गालफाडे व त्यांच्या सुविद्य आणि प्रेमळ पत्नी आणि ज्यांच्या नावातच शोभा आहे अशा प्रेमळ सुस्वभावी अर्धांगिनी सौ. शोभा वहिनी यांची मोलाची साथ तितकीच महत्त्वाची ठरली. कारण प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो. त्याप्रमाणे सौ. वहिनी या गालफाडे यांना लाभल्या हे त्यांचे भाग्यच होय. त्यांच्या तिन्ही मुली अनुक्रमे डॉक्टर पल्लवी , अभियंता योगिनी , अभियंता सायली उच्चविद्याविभूषित आहेत . त्यामुळे अभियंता गालफाडे साहेबांना भविष्यातील फारशी चिंता नसावी . कारण त्यांचे सहा बंधू अनुक्रमे विलास , शिवाजी , प्रकाश , विजय , विकास , संतोष आणि भगिनी रंजना शिंदे या एकूण सात जणांची साथ गालफाडे साहेबांना राहिलेली आहे.

कर्तव्य मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करायला भाग पाडणारे आहे. त्याचे कारण म्हणजे १९९० ची बॅच म्हणजे वेगवेगळे विचार , आचार आणि एकत्र आलेली असून अलग अलग वाद्यात , तालात सुरात सजणारी , भिन्न सूर असले तरी परस्परांना पूरक होऊन मदमस्त बेहोश करणारी मैफील आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे माझी सेवानिवृत्ती ३१ मार्च २०२३ रोजी झाली. त्यानिमित्ताने मी सेवापूर्ती सोहळा १ एप्रिल २०२३ रोजी लातूर येथे आयोजित केला होता आणि त्या सोहळ्याचे अध्यक्ष होते आदरणीय वसंतराव गालफाडे साहेब. मी उपविभागीय जलसंधारण अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालो. ते औरंगाबाद येथे प्रादेशिक जलसंधारण अधिकारी असताना व ३१ मार्च २०२३ ची धावपळ असतानाही आवर्जून माझ्या कार्यक्रमासाठी हजर झाले. यावरूनच त्यांच्या मनाचा मोठेपणा जाणवतो. म्हणून मी म्हणतो की ते एक सामान्याचा आधारवड आहेत, एक कुशल प्रशासक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. असे व्यक्तिमत्व म्हणजे सागराची खोली आणि हिमालयाची उंची, सूर्याचे तेज आणि चंद्राची शितलता , वटवृक्षाची छाया आणि मातीवरची माया , आभाळ आकाशाची ओढ आणि मित्राची जोड म्हणजे अभियंता वसंतराव गालफाडे साहेब.

एकूणच अभियंता वसंतरावजी गालफाडे साहेब यांचे कार्य व कर्तव्य मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करायला भाग पाडणारे आहे . त्यांची सेवानिवृत्ती ३० एप्रिल २०२५ रोजी होत आहे. कदाचित एका डोळ्यात हसू आणि एका डोळ्यात आसू येत आहेत . परंतु या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने अभियंता वसंतराव गालफाडे सरांवर स्मरणिका काढण्याची कल्पना माननीय मोरे साहेब यांनी दिली व सर्व हितचिंतकांनी मनात आणली त्याबद्दल निश्चितच धन्यवाद . कारण माझ्या सेवानिवृत्ती निमित्त संत जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद महाराष्ट्र यांनीही माझ्यावर गौरव

अंक काढला होता . त्या अंकाचे प्रकाशनही माझे मित्र अभियंता वसंतराव गालफाडे साहेब यांच्या उपस्थितीत सेवापूर्तीच्या निमित्ताने झाले होते. कदाचित माझ्यानंतर आमच्या सन १९९० च्या बॅच मध्ये स्मरणिका काढण्याचा हा दुसराच योग आहे . त्यांच्या कार्यक्रमाबद्दल आणि सेवानिवृत्तीच्या निमित्ताने मी इतकेच म्हणेन , थोडा उजेड ठेवा , अंधार फार झाला , पणती जपून ठेवा , अंधार फार झाला , कारण आज चोहीकडे अंध:कारमय वातावरण असतानाही काहीच्या कार्यातून मात्र आश्वासक उजेड दिसतो आहे. त्यांना जपून ठेवण्याचे महत्त्व अधिक वाढले आहे. अभियंता वसंतराव गालफाडे यांच्या कार्याची माहिती समाज आणि नव्या पिढीस प्रेरणा देणारी आहे. सेवानिवृत्तीच्या निमित्ताने अभियंता वसंतराव गालफाडे साहेब यांना माझे कुटुंबीय सौ. सुरेखा कावळे , चिरंजीव डॉक्टर कृष्णराज कावळे , चिरंजीव डॉक्टर जयराज कावळे यांच्या वतीने खूप खूप शुभेच्छा . तसेच , सन १९९० च्या सवंगड्या तर्फे देखील आभाळ भरून शुभेच्छा . सर्जनशील कार्य आणि समाज कार्य करण्यासाठी त्यांना उदंड आयुष्य आरोग्य लाभो ही मंगल कामना .

धन्यवाद

.

न पटणाऱ्या गोष्टी सोडून द्यायला शिकलं पाहिजे. कारण एकदा घेतलेला श्वास सोडून दिल्याशिवाय दुसरा श्वास घेता येत नाही.

शिक्षण हीच यशाची खरी गुरुकिल्ली !

इंजि. विलास कांबळे
अधीक्षक अभियंता, एमएसआरडीसी,
मुंबई

श्री वसंत बाबुराव गालफाडे साहेब यांची व माझी पहिल्यांदा भेट लातूर येथे पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन मध्ये शिकत असताना सन १९८५ मध्ये झाली. मी प्रथम वर्षाला होतो तेव्हा वसंतराव तिसऱ्या वर्षात शिकत होते. आम्ही दोघेही शासकीय वस्तीगृहात प्रकाश नगर लातूर येथे एक वर्ष सोबत राहिलो होतो. पदविका शिक्षण पुर्ण झाल्यावर जिल्हा परिषद लातूर येथे त्यांना नोकरी लागली. त्यानंतर लवकरच लग्नही झाले. परंतु झिरो बजेटमुळे ती नोकरी गेली. काही दिवस दुसऱ्या नोकरीकरिता भटकंती करावी लागली. सन १९९० मध्ये पाटबंधारे विभागात अनुसुचित जाती /जमातीसाठी कनिष्ठ अभियंता पदावर अनुशेष भरती निवड मंडळामार्फत निघाली. त्यामध्ये आमची निवड झाली.

त्यानंतर एप्रिल १९९० मध्ये आम्ही दोघेही पाटबंधारे विभागात कनिष्ठ अभियंता या पदावर आमची निवड झाली व पदस्थापना शिरसाळा कॅम्प येथे माजलगाव उजवा कालवा या कामावर झाली. आमच्यासोबत श्री कुरे, श्री कावळे, श्री गोपुलवाड, श्री नाईनवाड, श्री तेरोळे, श्री जुकटे, यांचीही पदस्थापना कॅम्प येथे झाल्यामुळे आम्हाला एकत्रित काम करण्याची संधी मिळाली. आम्हा सोबतच टी.ए. कांबळे, मोतूकपले,श्री शिरसेकर, यांची सोनपेठ कँप येथे तर आकोशकर शेरखाने, माने यांची गाडे पिंपळगाव येथे नेमणूक झाली होती. त्यावेळी श्री गालफाडे विवाहित असले तरी जास्त वेळ ते आम्हा मित्रांमध्येच घालवत असत. तसेच आम्ही नास्ता जेवणही एकत्रितच करत असू. मी व गौतम कुरे श्री वसंतरावांना **गुरु** म्हणून संबोधत असू. आम्ही दोघे सणावाराला त्यांच्या घरचे

सदस्य असल्यासारखे जेवणासाठी कायम निमंत्रित असायचो. वहिनीदेखील आम्हाला घरचे सदस्य असल्यासारखीच वागणूक देत असत, आमची काळजी घेत असत. आम्ही त्या काळात सर्वात जास्त पाहूणचार वसंतरावांच्या घरी घेतला आहे. वहिनींनी बनविलेल्या छान स्वयंपाकाचा आस्वाद आम्ही अनेकदा घेतला आहे हे सांगताना आम्हाला आनंद वाटतो आहे. त्यावेळी त्यांची मोठी मुलगी सोनी लहान होती. वसंतरावांची आणि आमची मैत्री इतकी घट्ट होती की त्यांचे भाऊ बहिणदेखील आम्हाला आमच्या सख्ख्या बहिण भावासारखेच वाटत होते. एकदा मी पानगावला जाऊन त्यांचे सगळे भाऊ, बहिण, आईवडील यांना भेटून आलो होतो. त्यांचे कुटुंब खूप मोठे आहे आणि सर्वजन आनंदाने एकत्र रहात होते. त्या कुटुंबात वसंतराव सर्वात मोठे होते. कुटुंबातील सर्वात मोठा मुलगा असलेले वसंतराव शिकले आणि इंजिनियर झाले. त्यामुळे सहाजिकच घरातील सर्व सदस्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

एकाद्या गरिब कुटुंबातील मोठा मुलगा शिकला आणि नोकरीला लागला की त्याच्यावर फार मोठे जबाबदारीचे ओझे येऊन पडते. लहान भावंडाचे शिक्षण, त्यांची लग्ने, नोकरी, इतर नातेवाईकांच्या अपेक्षा या सर्वांचा भार त्या एकमेव व्यक्तिवर येऊन पडतो. वसंतरावांना या सगळ्यातून जावे लागले आणि ते त्यांनी अतिशय आनंदाने पार पाडले आहे. वसंतरावाचे सर्व भाऊ मुळातच हुशार असल्यामुळे त्यांच्याकडून वसंतरावांना खूप अपेक्षा होत्या. आपले भाऊ शिकून मोठे अधिकारी होतील, स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी बनतील, डॉक्टर, इंजिनियर बनतील अशा मोठ्या अपेक्षा बाळगून होते. त्यामुळे कुटुंबातील उत्पन्न वाढून जबाबदाऱ्या वाटून घेतल्या जातील. परंतु अपेक्षेप्रमाणे फारसे काही झाले नाही. परिणामी वसंतरावांवरचा जबाबदरीचा बोजा वाढत गेला. परंतु ते कधी डगमगले नाहीत. आईवडीलांप्रति असलेले निस्सीम प्रेम, भावाबहिणींची काळजी, नातेवाईकांविषयी आपुलकी, मित्रत्वाचे नाते जपणे अशी सर्वच आघाड्यांवर त्यांची वाटचाल चालू होती. वसंतरावांच्या भावांकडून ज्या शिक्षणाबाबतच्या अपेक्षा होत्या त्या पूर्ण न झाल्यामुळे वसंतरावांनी नोकरीत असतानाच स्वत:चेच शिक्षण पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. नोकरी करता करता आणि कुटुंबाची जबाबदारी पार पाडता पाडता त्यांनी इंजिनियरींगच्या पदवीचे शिक्षण पुर्ण केले.

एप्रिल १९९३ मध्ये जलसंधारण विभागात परभणी येथे कार्यालय स्थलांतरित झाले. त्यावेळेस आम्ही दोघे व श्री कुरे सोबत होतो. सन १९९५ मध्ये वाल्मी येथे मी प्रतिनियुक्तिवर गेलो व वसंतराव नांदेड येथे नियुक्त झाले. त्यानंतर थोडा आमचा सहवास कमी झाला. मी एएमआयई करुन एमपीएससी/युपीएससी परीक्षा देत गेलो. त्यामध्ये मला यश मिळत गेले. त्यानंतर माझी भारतीय रेल्वेमध्ये नियुक्ति झाली. त्यावेळी वसंतरावांनी औरंगाबाद येथे पार्टटाईम बी.ई. पदवीसाठी प्रवेश घेतला. मिळेल तसा वेळ काढून प्रसंगी रात्री उशिरापर्यंत क्लासेस करुन बी.ईच्या परिक्षेत यश मिळविले. कोणत्याही गोष्टीत प्रामाणिकपणे कष्ट करायची इच्छा असेल तर निसर्ग निश्चित मदत करतो याची प्रचिती वसंतरावांना तंतोतंत मिळाली.

वसंतरावांनी बीई पदवी परीक्षा दिली परंतु एमपीएससी परीक्षेला लागणारी वयोमर्यादा त्यांनी ओलांडली होती. त्यावेळी ३३ वर्षे वयोमर्यादा होती. परंतु वसंतरावांची इच्छाशक्ति इतकी जबरदस्त

होती की या अडचणीवरदेखील त्यांना मात करता आली. तात्कालिन मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी पाच वर्षांनी वयोमर्यादा वाढविली. तरीदेखील त्यांचे वय अवघ्या दीड महिन्याने बसले. या आयुष्यातील एकमेव संधीचा फायदा त्यांनी अतिशय कष्टाने, मेहनत करुन उठविला. ही संधी हुकली तर पुन्हा क्लास वन अधिकारी होण्याची संधी मिळणार नाही याची जाणिव असल्यामुळे त्यांनी अपार कष्ट घेऊन अभ्यास केला आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यावेळी कुटुंबातील सर्वांच्यांच आनंदाला पारावार उरला नाही.

एमपीएससीची परीक्षा दिल्यानंतर सहाय्यक अभियंता श्रेणी १ या पदावर पाटबंधारे विभागात नियुक्ति झाली. जीवनाची परीक्षा घेणारा प्रसंग पार केल्यानंतर त्यांच्या आयुष्यालाच कलाटणी मिळाली. आई वडीलांचा आशीर्वाद , पत्नीची खंबीर साथ, तीन मुली असतानाही अभ्यास करुन परीक्षा देण्याची जिद्द व चिकाटी यामुळेच हे शक्य झाले. हे त्यांचे यश पाहून मला फारच आंनद झाला. कारण मीदेखील त्याच अवस्थेतून गेलो होतो. आई वडील, भावंडे, नातेवाईक, मित्र व समाज यांच्या आशीर्वादामुळे पत्नी, मुली आणि कुटुंबाची उत्तम साथ लाभल्यामुळे मेव्हणे चव्हाणसाहेबांचा पाठिंबा या सर्वांची परिनिती यश संपादन करण्यात झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूलमंत्र, शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा तसेच अण्णाभाऊंचा जग बदल घालूनि घाव मज सांगून गेले भीमराव हा मूलमंत्र आत्मसात करुन एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यात मिळालेले यश हे अतिशय महत्वपूर्ण आहे.

Great things are done when men and mountains meet. सहाय्यक अभियंता श्रेणी १, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता व शेवटी मुख्य अभियंता तथा अप्पर आयुक्त जलसंधारण ही पदे भूषवून शासकीय सेवेतून ते सेवानिवृत्त होत आहेत. मोठ्या पदावर कामे करुन समाजाची व देशाची सेवा करण्याची संधी त्यांना मिळाली. त्या संधीचे त्यांनी सोने केले आहे. त्यांची सेवानिवृती ही सेवानिवृत्ती नसून एक नवीन संधी आहे. आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी आणि छंदासाठी त्यांना वेळ देता येणार आहे. या वयातही त्यांना नवीन काहीतरी शिकण्याची जिद्द आहे. ते त्यांनी करावे. कुटुंबाला वेळ द्यावा. या सर्वांचा ते आस्वाद घेतील यात तीळमात्र शंका नाही.

माणूस आयुष्यात किती यशस्वी झाला हे तपासण्याचा प्रमुख ठोकताळा म्हणजे त्यांची पुढील पिढी काय करते? योग्य मार्गावर आहे की नाही यावरुन ठरविले जाते. याबाबतीत वसंतराव ११० टक्के आयुष्यात यशस्वी झाले आहेत असे म्हणावे लागेल. कारण त्यांच्या तीनही मुली हुशार आणि गुणवान असून त्यांनी शिक्षणात उंच भरारी घेत आपले जगातील स्थान निश्चित केले आहे. एक मुलगी डॉक्टर असून दुसऱ्या दोघीजणी इंजिनियर आहेत. त्यातील छोटी मुलगी तर परदेशात मोठ्या जबाबदारीच्या पदावर नोकरी करीत आहे. वास्तविक पहाता वसंतरावांच्या यशामध्ये त्यांच्या पत्नी शोभा वहिनी यांचा अत्यंत मोलाचा वाटा आहे. वसंतराव शासकीय सेवेत बिझी असताना घर सांभाळणे, मुलींचे संगोपन, त्यांचे शिक्षण, सासूसासरे, दीर, नणंद यांची काळजी घेणे, माहेरकडील आईवडील, भाऊ बहिण, वहिनी, लहान मुले, नातेवाईक यांची काळजी घेणे या सर्व जबाबदाऱ्या

अतिशय नीट पार पाडल्यामुळेच वसंतरावांना आपले लक्ष्य गाठता आले आणि आपल्या सेवेत ते यशस्वी झाले आहेत. पत्नीची पावलोपावली साथ असल्याशिवाय पती यशस्वी होऊ शकत नाही हेही तितकेच खरे!

श्री गालफाडे साहेब व माझी घरची परिस्थिती सारखीच होती. कुटुंब मोठे, घरची परिस्थिती हालाकीची. आई वडीलांच्या अथक पश्रिमामुळे शिक्षण घेणे शक्य झालेले. सरकारी नोकरी लागल्यानंतर स्वत:पुरते मर्यादित न रहाता मनामध्ये सर्वांना मदत करण्याची धडपड, आईवडीलांचा आशीर्वाद घेऊन भावंडाना शिक्षण देण्याची जिज्ञासा, आजूबाजूच्या सर्व नातेवाईकांचे कल्याण व्हावे ही भावना मनामध्ये ठेवून सर्वांना मदतीचा हात दिला. अनेकांचा आशीर्वाद मिळाल्यामुळेच जीवनामध्ये यशस्वी होण्याचा मार्ग मिळाला असे मी मानतो. आपल्या मदतीमुळे सर्व गालफाडे कुटुंब उच्च शिक्षित झाले व सर्वांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, भौतिक भरभराटही झाली. हे सर्व शिक्षणामुळे मिळाले आहे.

श्री वसंतरावांना तीनही मुलीच आहेत. परंतु तीनही मुली उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदावर नोकरी करायला लागल्या. मुलींनी आईवडीलांची शान वाढविली. आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा वाढविली. कौटुंबिक जीवन सुखी बनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की ज्या घरच्या मुली उच्च शिक्षण घेतात ते घर मी प्रगतीशील मानतो. ही बाब श्री गालफाडे साहेबांकरिता तंतोतंत लागू पडते.

श्री गालफाडे साहेब यांची शासकीय सेवा म्हणजे अतिशय शिस्तबध्द रितीने, कुठल्याही प्रकारच्या तक्रारी नाहीत की चौकशी नाही अशा प्रकारे स्वच्छपणे पार पडली आहे. यात त्यांचा प्रामाणिकपणा, कष्ट, शिस्त आणि सचोटी आहे. आमची मैत्री कौटुंबिक आणि जिव्हाळ्याची आहे. आम्ही सतत एकमेकांच्या संपर्कात असतो. सुखदु:खाला एकमेकांसाठी धावून जातो. निवृती म्हणजे केवळ करिअरचा शेवट नाही. ही जीवनातील एका नव्या अध्यायाची सुरुवात आहे. उत्साहाने आणि सकारात्मक मानसिकतेने निवृती स्वीकारुन आपण खरोखरच आपल्या जीवनातील सर्वात सुंदर टप्पा बनवू शकतो. माझ्या मित्राला सेवानिवृत्ती निमित्त खूप शुभेच्छा देतो आणि त्यांचे पुढील आयुष्य सुखाचे, समाधानाचे आणि आरोग्यदायी जावो अशा सदिच्छा व्यक्त करतो.

नाती टिकवणं कुलुपाकडून शिकावं कारण ते गंजून जाईल, कदाचित तुटूनही जाईल
परंतु चावी बदलणार नाही एवढं मात्र नक्की!

इंजि वसंतराव गालफाडे यांची औरंगाबाद येथे अधीक्षक अभियंता पदी नियुक्ति झाल्यानंतर क्रांतीवीर लहूजी साळवे कर्मचारी कल्याण महामंडळाच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

बीड येथे कार्यकारी अभियंता असताना स्वत: जातीने बंधाऱ्याच्या कामाची पहाणी करीत असताना श्री वसंतराव गालफाडे व सहकारी

बीड जिल्ह्यातील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामाची तांत्रिक पहाणी करताना कार्यकारी अभियंता श्री वसंतराव गालफाडे व सहकारी

धीरोदत्त वसंतराव !

इंजि.दिलीप प्रक्षाळे
से.नि. अधीक्षक अभियंता,
जलसंधारण प्रा.विभाग, पुणे

अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, नागपुर प्रादेशिक विभाग, मृद व जलसंधारण, नागपूर यांना नव्या इनिंगसाठी प्रथम शुभेच्छा!

इंजि. वसंतराव गालफाडे यांचा व माझा परिचय सन २०१८ पासूनचा आहे. नागपूरच्या डिसेंबर हिवाळी अधिवेशनात बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या जलसंधारण बांधकामासंबंधित तसेच अतिवृष्टीत खरडून गेलेल्या शेत जमीनींच्या नुकसान भरपाई बाबत तारांकित प्रश्न उपस्थित झालेला होता. त्यावेळी मी मंत्रालयात अवर सचिव तथा कार्यकारी अभियंता असल्याने क्षेत्रीय कार्यालयातून उत्तर घेऊन ते मंत्रालयीन नमुन्यामध्ये मांडून ते विधानसभेत सादरीकरण करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आलेली होती. श्री वसंतराव यांनी सर्व बीड जिल्ह्यातील बाधित जलसंधारण बांधकामे व जमीनीचा स्वत: सर्व्हे करून मुद्देसूद उत्तर घेऊन नागपूर येथे आले होते. मला त्या उत्तरात काहीही बदल करावा लागला नाही. आपले विचार परखडपणे मांडणारे, वेळप्रसंगी वरिष्ठांचा रोष पत्करून वसंतराव नेहमीच आपले मत मांडत असत. त्याच्या डीडब्ल्यूसीओच्या काळात बीड विभागात अत्यंत गुणवत्तापूर्ण कामे झाली. श्री वसंतराव गालफाडे साहेबांची कामाची पद्धत बघून कोणीही विभागातील कामांची तक्रार करीतच नसत. सखोल अभ्यास असल्याने आणि कामाच्या बाबतीत नेहमीच परिपूर्ण असल्याने त्यांच्या नादी पत्रकार, पुढारी, अधिकारी कोणीही लागत नसत.

तसे मी व श्री गालफाडेसाहेब पुर्वीचे जलसंपदा विभागात कार्यरत असणारे अभियंते होतो. परंतु जलसंपदा विभागात प्रमोशन संधी नसल्याने आम्ही जुलै २०१७ मध्येच जलसंधारण विभागात समावेशन होण्याचा विकल्प दिला होता. त्याप्रमाणे आम्ही जलसंधारण विभागात आम्हाला जुलै २०२० ला ३ वर्ष पूर्ण झाल्यावर आम्ही प्रमोशनसाठी प्रयत्न सुरु केले. परंतु विभागात प्रस्थापित यंत्रणा जलसंपदा विभागातील प्रतिनियुक्तीवरील कार्यकारी अभियंता यांना प्रमोशन काढण्याच्या अंतिम टप्प्यात असताना मी, वसंतराव व यशवंतराव थोरात असे तिघेजणांनी

आम्ही नागपूर मॅटमध्ये प्रकरण दाखल केले. त्यावेळी प्रचंड दबावात असताना वसंतराव यांनी आम्हाला फार मोठा धीर दिला व त्या प्रकरणात आम्हाला यश आले ते फक्त वसंतराव मुळेच.

श्री वसंतरावांच्या धीरामुळेच आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम राहिलो आणि आमचे प्रमोशन झाले. मी व वसंतराव अधीक्षक अभियंता झालो. मी पुणे प्रादेशिक विभागात तर वसंतराव छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात प्रादेशिक जलसंधारण अधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारली. माझ्याकडे मंत्रालयात सहसचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. श्री वसंतराव यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी गुणवत्तापूर्ण कामे करून पदाला न्याय दिला. असे हे वसंतराव नोव्हेंबर २०२४ मध्ये आणखी एक पायदान सर करून मुख्य अभियंता झाले. कनिष्ठ अभियंत्याचा मुख्य अभियंता होणे ही एक असामान्य पद उपलब्धी मिळवून दाखवली. धन्य ते माता पिता. ज्यांच्या पोटी अशा सद्गुणी पुत्रांचा जन्म झाला आणि त्याने सामाजिक सेवेचा वसा घेतला. वसंतरावांनी आपल्या कर्तृत्वाने आपल्या शासकीय सेवेत आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता हा सर्वांना प्रेरणा देणारा प्रवास आहे. मेहनत आणि जिद्द या गोष्टी अंगिकारल्या की आयुष्यात काहीही साध्य करणे अशक्य नाही हे वसंतरावांच्या शासकीय सेवेतील प्रवासातून पहायला मिळते. असे हे वसंतराव ३० एप्रिल २०२५ रोजी नियत वयोमानानुसार शासन सेवेतून निवृत्त होत आहेत. त्यांचे उर्वरित आयुष्य सुखकर, आनंददायी, आरोग्यदायी व भरभराटीचे जावो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

त्रास असतानाही प्रामाणिक राहणे, संपत्ती असूनही साधे राहणे, अधिकार असूनही अगदी नम्र राहणे, राग असूनही शांत राहणे यालाच आयुष्याचे व्यवस्थापन म्हणतात!

वसंतराव गालफाडे एक सदाबहार व्यक्तिमत्व !



इंजि.सतिश देशपांडे
से.नि. उपविभागीय अभियंता
जलसंधारण विभाग, बीड

महाराष्ट्र राज्याच्या मृद व जल संधारण प्रादेशिक विभाग नागपूरचे मुख्य अभियंता इंजि. वसंतराव गालफाडे दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी प्रदीर्घ शासकीय सेवा यशस्वीरित्या पूर्ण करुन सेवा निवृत्त होत आहेत. मला त्यांच्यासोबत जवळपास अडीच वर्षे सेवा करण्याची संधी मिळाली. त्याबद्दल मी धन्यता मानतो.

तसी त्यांची व माझी पूर्वी ओळख नव्हती. कारण मी जलसंपदा विभागात काम करीत होतो. श्री गालफाडे साहेब त्यावेळी जलसंधारण विभागात कार्यरत होते. मी उपविभागीय अधिकारी झाल्यावर जलसंधारण विभागात आलो. माझ्याकडे बीड येथे कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यावेळी इंजि. वसंतराव गालफाडे साहेब यांची पदोन्नती झाली व त्यांची पदस्थापना बीड येथे कार्यकारी अभियंता म्हणून झाली. त्यामुळे मला त्यांना कार्यभार हस्तांतरण करण्याची संधी मिळाली.

त्यानंतर दोन अडीच वर्षे त्यांच्या हाताखाली काम करत असताना अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात काम करता आले. त्यांच्या सहवासात काम करीत असताना त्यांच्या स्वभावाचे काही पैलू विशद करणे मला उचित वाटते. श्री वसंतराव गालफाडे साहेबांचा सर्वात महत्वाचा भावलेला गुण म्हणजे त्याचा वक्तशीरपणा! आपल्या सेवा कालात ते वेळेला फार महत्व देत असत. त्यांनी कधी सकाळी ११ वाजता साईटवर जायचे आहे असे सांगितले असेल तर त्याचे कधीही ११.३० झाले नाहीत. त्यामुळे त्यांच्या वक्तशीरपणामुळे आम्हीही त्यांच्याकडून तो वक्तशीरपणा आत्मसात केला. त्यांचे दुसरे असे की कामाचा कितीही व्याप असला तरी नित्याची कामे ते कधीही विसरत नसत. जसे की दररोज ते योगासने, व्यायाम करायला कधीही विसरत नसत. सहाजिकच आमच्या विभागाचे काम खूप गतीने होत असे. टीमवर्कमध्ये काम केल्यामुळे बीड जिल्ह्याला दिल्लीचा जलसंधारण कामाचा

पुरस्कार देखील मिळाला आहे. त्यामध्ये श्री गालफाडे साहेबांच्या कार्यशैलीचा मोठा वाटा आहे.

श्री गालफाडे साहेबांचा आवडलेला आणखी एक स्वभाव विशेष म्हणजे त्यांचा मोबाईल फोन आमच्यासाठी २४ तास चालू असायचा. त्यामुळे कामाबाबत काही अडचण आल्यास कोणत्याही वेळी फोन केल्यास फोन ताबडतोब उचलला जायचा आणि आमच्या समस्यांचे निराकरण व्हायचे. परिणामी कामे वेगाने मार्गी लागण्यास मदत होत असे. एकादे वेळी बैठकीमध्ये असल्यामुळे मोबाइल फोन उचलता आला नाही तर बैठक संपताच त्यांचा कॉल बॅक यायचा. हा त्यांचा गुण आम्हा सहकाऱ्यांनी त्यांच्याकडून आत्मसात केला आहे. ते नेहमी याबाबत आम्हाला सांगत असत की एकाद्याचा फोन न उचलणे म्हणजे अडचणी वाढविणे होय! त्यामुळे कामासंबंधीचे फोन वेळच्यावेळी उचलले गेले पाहिजेत. तीच सवय आम्हीदेखील स्वत:ला लावून घेतली.

मी धारुर उपविभागात उपअभियंता होतो. माझ्या उपविभागात सोनीमोहा या गावात बंधाऱ्याचे काम चालू होते. त्या गावात दोन गट होते. त्यापैकी एका गटाने बंधाऱ्याचे काम खराब होत आहे अशी जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार केली होती. याबाबतची माहिती मला दुपारी दोन वाजता समजली. लगेच ही बाब मी श्री गालफाडेसाहेब यांच्या कानावर घातली. ते कार्यालयातच होते. ते लगेच मला म्हणाले, चला आपण थेट बंधाऱ्याच्या कामावर जाऊ. आम्ही दोघेही कामाच्या साइटवर पोहचलो. तेव्हा अतिशय व्यवस्थितरित्या काम सुरु होते. कोणतीही अनुचित बाब आढळून आली नाही. आम्ही त्या कामाचे फोटोदेखील घेतले आणि बीडला आलो. त्यानंतर आम्ही थेट बीड जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. साहेबांनी माझ्यासह स्वत: जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली आणि कामाबाबत सर्व माहिती सविस्तर दाखवून आताच कामाच्या ठिकाणी भेट देऊन पहाणी करुन त्याचे फोटोही घेऊन आल्याचे सांगितले. त्यावर जिल्हाधिकारी खूप खूष झाले. त्यानंतर आमच्या विभागाची काहीही तक्रार आली तर स्वत: कलेक्टरसाहेब गालफाडे साहेबांशी चर्चा करायचे आणि त्यावर त्वरीत समस्येचे निराकरण व्हायचे. त्या प्रसंगानंतर आम्हाला काम करताना काहीही त्रास झाला नाही. साहेबांच्या समय सुचकतेमुळेच हे शक्य झाले असे माझे ठाम मत आहे.

असा हा सदाबहार अभियंता आज सेवानिवृत्त होत आहे. ते वरिष्ठ असतानादेखील आमच्यामध्ये सामील होत असत. याचा आम्हाला खूप आनंद वाटत असे. त्यांनी आपल्या शासकीय सेवेत खूप काम केले. आता त्यानी आपला वेळ स्वत:साठी द्यावा. आता त्यांनी सर्व जगाचा प्रवास करावा, सामाजिक कार्याची आवड जोपासण्यासाठीही वेळ द्यावा. यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा! सेवानिवृत्ती नंतरचे जीवन सुखी, समाधानी आणि निरोगी जावो यासाठी आमच्या सर्व कर्मचाऱ्यांच्यातर्फे त्यांना अतिशय मन:पूर्वक शुभेच्छा !

शब्द हे हृदयातून येत असतात परंतु त्याचे अर्थ मात्र डोक्यातून लावले जातात

नेतृत्वगुण संपन्न गालफाडेसाहेब

इंजि. राहुल जाधव
मा.महासचिव बानाई
महाराष्ट्र राज्य

माननीय वसंतजी गालफाडे साहेब मुख्य अभियंता जलसंधारण विभाग यांच्या सेवानिवृत्ती प्रित्यर्थ प्रकाशित होणाऱ्या त्यांच्या या विशेषांकासाठी एक मानाचे पान माझ्या वाट्याला आल्याचा मला अतिशय आनंद व समाधान वाटत आहे. श्री गालफाडे साहेबांशी माझा संपर्क ते सहाय्यक अभियंता असल्यापासूनचा आहे. त्यावेळी ते अधीक्षक अभियंता देपाजे साहेब यांच्याकडे कार्यरत होते. अतिशय धडाडीचे व्यक्तिमत्व असलेले वसंतराव गालफाडे यांची शैक्षणिक वाटचाल तसेच शासकीय कारकीर्द ही अतिशय वाखाण्याजोगी आहे. लातूर येथील पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन मधून पदविका स्थापत्य अभियांत्रिकी पूर्ण केल्यानंतर त्यांनी ज्युनिअर इंजिनिअर या पदावर आपली सेवा सुरु केली. तसेच आपले शैक्षणिक बुक समजण्यासाठी त्यांनी बीई ही पदवीदेखील अतिशय जिद्दीने पूर्ण करून सेवा काळातच महाराष्ट्र लोकसेवा आयोगच्या मार्फत वर्ग एक च्या पदाकरता स्वतःला यशस्वीरित्या स्थापित केले.

त्यानंतर ते उपअभियंता या पदावर वैजापूर येथे पदस्थापित झाले. नंतर उत्तरोत्तर कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता तसेच मुख्य अभियंता या पदापर्यंत पोहोचले. या सर्व काळात मी त्यांच्यासोबत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स अर्थात बानाई या संघटनेत सोबत कार्यरत होतो. माननीय गालफाडे साहेब हे औरंगाबाद जिल्हा बानाईचे सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांची कारकीर्द फारच वाखाण्याजोगी राहिली आहे. मी त्याच काळात बानाई महाराष्ट्र महासचिव या पदावर संघटनेत कार्यरत असताना आम्ही महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात बानाई कार्यान्वित करण्यासाठी अतिशय धडाडीने प्रयत्न केले होते. त्यावेळी त्यांच्यातील नेतृत्व गुणांचाही जवळून परिचय झाला.

श्री वसंतरावजी गालफाडे साहेब यांनी आपल्या कठोर परिश्रमाने, जिद्दीने शासनसेवा केली त्याचप्रमाणे त्यांनी सामाजिक जीवनातही त्यांच्या कार्याचा ठसा उमटविला आहे. अनेक गरजूंची त्यांनी स्वतः मदत केली आहे. हा समाज त्यांचा सदैव ऋणी राहील.

त्यांचा हा सामाजिक कार्याचा वसा ते सेवा निवृत्तीनंतरही असाच कायम ठेवतील ही अशा बाळवून मी माझे मनोगत येथे संपवतो.

राज्याच्या मृद व जलसंधारण विभागाचे सचिव श्री एकनाथ डवले यांनी जलसंधारणाच्या कामाची पहाणी करण्यासाठी भेट दिली. त्यावेळी इंजि. वसंतराव गालफाडे, इंजि.व्ही.बी. नाथ, इंजि. आर.पी. काळे आदि अधिकारी उपस्थित होते.

बीड येथे कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्त झाल्यानंतर कार्यालयीन कर्मचारी व अधिकाऱ्यांतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथे जलसंधारण मंडळ, अधीक्षक अभियंता पदाचा पदभार इंजि. सुनील काळे यांच्याकडून स्वीकारल्यानंतर इंजि. वसंतराव गालफाडे

छत्रपती संभाजीनगर येथे अधीक्षक अभियंता, जलसंधारण मंडळ पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर कार्यालयातील सर्व कर्मचारी वृंदाने इंजि. वसंतराव गालफाडे यांचे स्वागत केले.